# महात्मा गांधींवरील पुस्तकाचे प्रकाशन

**मुंबई :** २ ऑक्टोबरला महात्मा गांधींच्या जयंतीदिनी बँक नोट्स, कॉइन्स आणि स्टॅम्प्सद्वारे 'महात्मा गांधींचे विशेष संस्मरणीय 'ग्लोबल कलेक्टीबलस ऑफ महात्मा गांधी थ्रू बँक नोटस, कॉइनस अॅण्ड स्टॅम्पस' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकात १५ ऑगस्ट १९४८ पासून आजपर्यंत जगभरातील १४४ देशांनी गांधीजींवर प्रसिद्ध केलेले विविध स्टॅम्प, नाणी आणि नोट्स यात आहेत. हे पुस्तक मिंटेज वर्ल्डने संकलित आणि लाँच केले आहे. मिंटेज वर्ल्ड : जुन्या आणि नवीन नाणी, स्टॅम्प आणि बँक नोट्सवरील जगातील पहिले ऑनलाइन संग्रहालय आहे. विविध ई-कॉमर्स वेबसाइट्स आणि पुस्तकांच्या दुकानांवर उपलब्ध असणार आहे. उद्योजक सुशीलकुमार अगरवाल यांची ही संकल्पना आणि पुस्तक आहे.